नोंदणी क्रमांक – एस.ए.टी/के.आर.डी/आर.एस.आर/सी.आर./८०३/९५-९६

# जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्था मर्या., कराड

मुख्य कार्यालय – ६७, गुरुवार पेठ, कराड –४१५११० दूरध्वनी क्र.०२१६४–२२३८६०

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कराडची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, दि.२९ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी ९ वा. कृष्णाबाई मंगल कार्यालय (जुने), सोमवार पेठ, कराड येथे खालील विषयांचा विचार करुन निर्णय घेणेसाठी संपन्न होणार आहे. सदर सभेस आपण कोव्हिड-१९ संसर्गाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन पध्दतीने उपस्थित रहावे, अशी विनंती आहे. सभेच्या लिंकबाबत व इतर सूचना खाली दिलेल्या आहेत.

### – सभेपुढील विषय –

१. मागील वर्षासाठीच्या दि.२८ जानेवारी २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. संचालक मंडळाने सादर केलेला सन २०२०–२१ चा अहवाल, ताळेबंद व नफा–तोटा पत्रकाचा विचार करून स्वीकृत करणे.
३. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२०–२१ च्या नफा विनियोजनास मंजूरी देणे.
४. सन २०२१–२२ चे अंदाजपत्रकास मान्यता देणे व सन २०२०–२१ चे अंदाजपत्रकापेक्षा कमी अथवा जादा झालेल्या उत्पन्न व खर्चास मान्यता देणे.
५. सन २०२०–२१ चा वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल वाचून स्वीकृत करणे.
६. सन २०१९–२० च्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालास मंजूरी देणे.
७. सन २०२१–२२ करिता वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८. सन २०२०–२१ मध्ये संचालक मंडळाने निर्णय घेऊन निधीमधून केलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणे.
९. महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७५ (२) मधील तरतुदीनुसार संचालकांना व त्यांचे कुटुंबियांना दिलेली कर्जे व वसुली पत्रकाची नोंद घेणे.
१०. प्रशिक्षण / कर्ज / गुंतवणूक / वसुली इ. तत्सम विषयांबाबतच्या संस्थेच्या वार्षिक धोरणांना मंजुरी देणे.
११. संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीस मंजूरी देणे. (मसूदा वेबसाईटवर/शाखेत उपलब्ध केला आहे.)
१२. महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचे निर्देशांनुसार केलेल्या कोव्हिड–१९ कर्ज हप्तेवाढ योजनेच्या (कर्ज रिशेड्युलमेंट) कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देणे.
१३. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत करणे.
१४. मा. अध्यक्षांचे अनुज्ञेने आयत्या वेळचे विषयावर चर्चा करणे.
१५. आभार.

**दिनांक – १५ सप्टेंबर २०२१**
**स्थळ– कराड**

**विनायक कृष्णराव फडके**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
(संचालक मंडळाचे अनुज्ञेवरुन)

### – सूचना –

* गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास सदर वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर ऑनलाईन पध्दतीने सकाळी ९.३० वा. होईल. या सभेस गणसंख्या पूर्ततेची आवश्यकता राहणार नाही.
* कोव्हिड–१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून दिलेले निर्देश व नियमांचे पालन करून ऑनलाईन पद्धतीने या सभेचे आयोजन केले आहे. याकरीता आवश्यक असणारी लिंक सभेच्या दिवशी सभेच्या अगोदर अर्धा तास सभासदांना संस्थेकडील त्यांच्या रजिस्टर्ड मोबाईल नंबरवर पाठविण्यात येईल. सदर लिंकच्या माध्यमातून सभासदांनी ऑनलाईन उपस्थित रहावे. यासाठी मंगळवार दिनांक २१ सप्टेंबर २०२१ अखेर सभासदांनी आपले नाव, पूर्ण पत्ता, सभासद क्रमांक, मोबाईल नंबर आणि ई–मेल आयडी इ. माहिती shares@jankalyankarad.com या ई–मेलवर अथवा लेखी स्वरूपात शेअर्स विभाग, मुख्यकार्यालय, कराड येथे सादर करावी.
* सभेत सहभागी होण्यासाठी आवश्यक ती तपशीलवार कार्यपध्दती संस्थेच्या www.jankalyankarad.com या वेबसाईटवर उपलब्ध करत आहोत.
* सभासदांना संस्थेच्या कामकाजाविषयी माहिती व प्रश्न विचारावयाचे असतील तर त्यांनी सभेच्या दिनांकापूर्वी तीन दिवस आधी संस्थेच्या मुख्य कार्यालयात कामकाजाचे दिवशी सकाळी १० ते सायं. ६ या वेळेत लेखी स्वरूपात शेअर्स विभाग, मुख्यकार्यालय, कराड येथे अथवा shares@jankalyankarad.com या ई–मेलवर सादर करावेत. आयत्यावेळी विचारलेली माहिती देणे शक्य होणार नाही याची सभासदांनी कृपया नोंद घ्यावी.
* सभासदांना संचालक मंडळाचा अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक, उपविधी दुरुस्तीचा मसूदा संस्थेच्या मुख्य कार्यालयात व सर्व शाखांमधून सभासदांच्या पुर्वसुचनेनुसार कामकाजाचे दिवशी सकाळी १० ते सायं. ६ या वेळेत पहावयास मिळेल. तसेच संस्थेच्या www.jankalyankarad.com या वेबसाईटवर पहावयास मिळेल.
* काही अनपेक्षित परिस्थितीत जसे तांत्रिक कारणांमुळे सभेचे कामकाज खंडित झाल्यास, तांत्रिक त्रुटींचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंकवर सभेचे कामकाज पुढे सुरू केले जाईल. कोणत्याही सभासदास तांत्रिक अडचणीमुळे सभेस जॉईन होता आले नाही तर त्यास संस्था जबाबदार राहणार नाही.

***